माननीय श्री. विलासराव देशमुख
मुख्यमंत्री 24-8-2001
महाराष्ट्र राज्य
मुंबई – 400 032

स.न.

अधिक निधी निर्मितीकरिता महाराष्ट्र शासन मोठ्या प्रमाणात दारुच्या दुकानांचे नवीन परवाने देण्याचा विचार करीत आहे अशी बातमी आहे. तसे केल्यास महाराष्ट्रात काय परिणाम होतील ते आपल्या लक्षात आणून देण्यासाठी हे पत्र.

1. समाजातील दारुच्या अुपलब्धीच्या प्रमाणात दारुड्यांची, व्यसनींची निर्मिती होते असा जागतिक आरोग्य संघटनेचा निष्कर्ष आहे. ज्या अविकसित देशांमधे (अुदा. मेक्सिको, कोस्टारिका) मुबलक दारु अुपलब्ध झाली, तिथे 10 टक्के पुरुष दारुचे व्यसनी झालेत. महाराष्ट्रातील साडे नअू कोटी लोकसंख्येतील केवळ पुरुषच व्यसनी बनणार असे मानले तरी 3 कोटी पुरुषांपैकी दहा टक्के म्हणजे 30 लक्ष पुरुष दारुडे बनतील. म्हणजेच 30 लक्ष कुटुंब अथवा दीड कोटी लोकसंख्या अुध्वस्त होईल. महाराष्ट्राच्या अेक षष्ठांश लोकसंख्येला अुध्वस्त करुन कोणता विकास किंवा जनकल्याण शासन साधणार आहे ?

2. अेखाद्या समाजातील दारुचा वापर काही प्रमाणात वाढला तर दारुचे दुष्परिणाम केवळ तेवढ्याच प्रमाणात नव्हे तर त्याच्या वर्ग (square)प्रमाणात वाढतात असे या विषयावरील शास्त्रज्ञाचे निष्कर्ष आहेत. (लेडरमन.) म्हणजे दारु दुकाने वाढवून महाराष्ट्रातील दारुचा खप दुप्पट वाढला तर दुष्परिणाम चार पटींनी वाढतील.

3. दारुमुळे दारुड्यांचे आयुष्य सरासरी 15 वर्षांनी कमी होते अशी वैद्यक शास्त्रांतील आकडेवारी आहे. म्हणजे महाराष्ट्रात 30 लक्ष गुणीला 15 वर्षे = 4.5 कोटी मानवीय वर्षांचे आयुष्य नष्ट होणार. दरवर्षी किमान 2 लक्ष पुरुषांचे मृत्यू दारुमुळे होतील. ही संख्या अेड्समुळे होणा-या मृत्यूंच्या जवळपास शंभरपट आहे. हा शासन निर्मित महा-अेड्स होईल.

4. ब्रिटिश सरकारच्या 'दि ऑफिस ऑफ हेल्थ इकॉनामिक्स'ने काढलेल्या आकडेवारीनुसार दारु न पिणारे वर्षाला 12 दिवस कामावरुन गैरहजर राहतात तर भरपूर दारु पिणारे वर्षाला 60 दिवस. म्हणजे महाराष्ट्रात 30 लाख × 60 = 18 कोटी कामाचे दिवस दर वर्षाला गैरहजिरीमुळे वाया जातील. प्रतिदिवसाची सरासरी अुत्पादकता 100 रु. मानल्यास, केवळ गैरहजिरीमुळे वर्षाला 1800 कोटी रुपयांचे नुकसान होईल.

5. दारुमुळे शासनाची तिजोरी भरेल पण समाजाची रिकामी होईल. शासकीय कार्यक्रमांकरिता निधीसाठी दारुविक्रीचे हजारो नवीन परवाने देण्याचे तर्कशास्त्र मानवविरोधी आहेच पण अर्थशास्त्रीय दृष्ट्याही साफ चूक आहे. कारण

अ) दारुची समाजाला द्यावी लागणारी संपूर्ण किंमत (रोग, त्यांचा अुपचार, अपंगत्व, अकाली मृत्यू, कामावरुन गैरहजिरी, गुन्हे, अपघात, पोलीस, न्यायालय, तुरुंग, अनाथ मुले अि.) मोजल्यास ती दारुपासून मिळणा-या अुत्पन्नापेक्षा 25 ते 40 पटींनी जास्त आहे असा अमेरिकेतील अर्थशास्त्रज्ञांनी (शिफ्रिन) व जागतिक बँकेच्या तज्ञांनी (जेम्स सर्सोने) हिशोब काढला आहे. अविकसित देशांचे प्रमुख भांडवल 'माणसे' आहेत. त्यांना नष्ट करुन आर्थिक विकासाचा आधारच नष्ट होणार. म्हणून अविकसित देशांनी दारुविक्रीवर नियंत्रणे आणावी व दारुची समाजातील अुपलब्धी कमी करावी अशी शिफारस जागतिक आरोग्य संघटना करते.

आ) जागतिक बँकेचा अहवाल या निष्कर्षाशी येतो - "बहुतेक देश शिक्षण आणि आरोग्यावर भर देअून विकास साधण्याच्या प्रयत्नात असतानाच अेकीकडे दारुमुळे अुद्भवणा-या समस्यांमध्ये लक्षणीय वाढ झाली आहे आणि जिथे जिथे दारु अुत्पादन आणि दारुच्या समस्यांवर सरकारे नियंत्रण ठेवू शकलेली नाहीत, त्याविरुध्द प्रभावी अुपाययोजना करु शकलेली नाही, तिथे तिथे दारुमुळे मृत्युमुखी पडणा-यांचे प्रमाणही वाढले आहे. माणसांचे वाढते अुत्पन्न आणि दारुचे वाढते अुत्पादन अंतिमत: राष्ट्राच्या प्रगतीलाच बाधा आणणारे ठरते."

"दारुच्या दुष्परिणामांना 15 ते 24 या वयोगटातील तरुण, तसेच अल्प अुत्पन्न गटातील माणसे सर्वाधिक बळी पडतात; कारण या माणसांना दारुपासून होणा-या अपायांची कल्पनाच नसते. दारु समाजाकडून जबर किंमत वसूल करते."

इ) दारुच्या दुष्परिणामांसाठी त्यापासून आर्थिक फायदा घेणारे शासनच जबाबदार राहणार. 30 लाख दारुड्यांची जबाबदारी शासन कशी सांभाळणार ? गेली 7 वर्षे गडचिरोलीमधे व्यसनमुक्तीचा अनुभव व 2000 व्यसनींच्या अुपचार व फायद्याच्या काटेकोर हिशोबावरुन आम्ही आपणास कळवू अिच्छितो की अेकदा व्यसन लागल्यावर, अेका व्यसनीला 1 वर्ष व्यसनमुक्त ठेवण्यास किमान 5000 रु. खर्च लागतो. हा स्वयंसेवी संस्थेमधील खर्च आहे. शासकीय योजनांमधे जास्त खर्च लागेल. म्हणजे महाराष्ट्रातील संभाव्य 30 लाख दारुड्यांच्या निव्वळ अुपचारासाठी प्रतिवर्षी 1500 कोटी रुपये खर्च करावे लागतील. ते आपण करणार आहात का? शिवाय 30 लाख अुध्वस्त कुटुंबातील स्त्रिया, मुले, गुन्हे-अपघातांचे निष्पाप बळी यांना भरपाई कोण व किती देणार?

ई) स्व. राजीव गांधींनी म्हटल्याप्रमाणे शासनाच्या अुत्पन्नापैकी 85 टक्के पैसा पगार व इमारती यावर खर्च होत असल्याने, दारुपासून वाढीव अुत्पन्नाच्या केवळ 15 टक्के पैसा लोकांपर्यंत पोचणार. दारुच्या दुष्परिणामांची व ते निस्तरण्याची अेकूण किंमत यापेक्षा कितीतरी अधिक आहे.

म्हणून दारुचा वापर वाढवून कर निर्मिती ही अर्थशास्त्रीय घोडचूक आहे.

6. नव्या आर्थिक धोरणांच्या प्रभावाखाली दारुचा व्यापार व विक्री वाढवून दारु मुबलक अुपलब्ध झाल्यावर रशिया व पूर्व युरोपातील भूतपूर्व साम्यवादी देशांमधील प्रौढ लोकसंख्येचा मृत्युदर 1990 ते 2000 या दहा वर्षात वाढला आहे. याला 'ईस्ट युरोपिअन पॅरॅडॉक्स' हे नाव दिले गेले आहे. विकसित देशांमधील प्रौढ मृत्युदर वाढण्याचे हे अेकमात्र अुदाहरण व दारु हे त्याचे अेक महत्वाचे कारण आहे. भारतात याहून अधिक विध्वंस होणार.

7. दारुप्रमाणेच दुसरे व्यसन तंबाखू व त्याचे विविध प्रकार आहेत. त्यापासून शासनाला भरपूर कर मिळतो. पण तरी आरोग्यदृष्ट्या तंबाखू घातक आहे व म्हणून अर्थशास्त्रीय दृष्ट्याही चूक आहे असे मानून जागतिक आरोग्य संघटनेने 'तंबाखूमुक्त जग' हा कार्यक्रम घेतला असून 150 देशांच्या शासनाचे प्रतिनिधी ही नवीन जागतिक नीती आखत आहेत. त्यात भारत सरकारही आहे. तंबाखूमुळे होणा-या मानवीय आयुष्याच्या नुकसानापेक्षा दारुमुळे दीडपट अधिक नुकसान होते अशी जागतिक बँकेची आकडेवारी आहे. (World Development Report : Global burden of diseases

1993.) अेकीकडे तंबाखूचा वापर कमी करण्याची भारताची नीती राहणार, व दुसरीकडे महाराष्ट्रातील दारु वाढवण्याची नीती राहणार का?

8. गडचिरोलीतील दारुमुक्ती आंदोलनाच्या दरम्यान गावकरी व स्त्रियांनी मिळून बंद केलेली गावातली दारु यामुळे प्रभावित होअून महाराष्ट्र शासनाने ग्रामसभा किंवा स्त्रिया 50% बहुमताने म्हणतील तेथील दारुचे दुकान बंद करण्याची नीती स्वीकारली. या नीतीअंतर्गत अंमलबजावणी जिकीरीची असल्याने आपल्या गावातील / मोहल्ल्यातील दारुचे दुकान प्रत्यक्ष बंद करुन घेण्यासाठी महिलांना प्रचंड लढाई करावी लागते. त्यामुळे प्रथम दोन वर्षात संपूर्ण महाराष्ट्रात केवळ 50 दारु दुकाने या नियमांतर्गत बंद होअू शकली. अेक अेक दुकान बंद करायला स्त्रियांना वर्षानुवर्ष झगडावे लागते, अपमान, धमक्या, मार झेलावे लागतात. आता शासन अेका झटक्यात हजारो नवीन दारु दुकाने सुरु करणार! हा अेवढा मोठा अन्याय का?

9. दारु अुत्पादन शुल्क मंत्री श्री. अनिल देशमुख यांनी दारुपासून शासनाला मिळणारे अुत्पन्न वाढवण्यासाठी हातभट्टयांवर कठोर व व्यापक कारवाईचा मार्ग सूचित केला आहे. त्यामागील हेतू भलताच असला तरी हा अुपाय स्वागतार्ह आहे. पण शासनाची गंमत वाटते. जिथे शासकीय आदेशाने दारुबंदी आहे त्या वर्धा व गडचिरोली जिल्ह्यात, वारंवार विनंती करुनही, हातभट्टया बंद करण्यात शासनाला मुळीच रस नाही. पण जिथे दारुबंदी नाही तेथील हातभट्टया बंद करण्यात शासनाला अुत्साह वाटतो. (तो देखील वास्तवात येईल तो सुदिन.) म्हणजे दारुच्या अुत्पन्नात लाभांश मिळवण्याची शासनाची हातभट्टीवाल्यांसोबत स्पर्धा आहे.

जिथे शासकीय दारुबंदी आहे त्या गडचिरोली व वर्धा जिल्ह्यात प्रथम हातभट्टया बंद करण्यात शासनाची प्रतिष्ठा आहे. अन्यथा 'हातभट्टीवाल्यांचा स्पर्धक' या निम्न पातळीवर शासन अुतरते.

10. गडचिरोलीत 'शोधग्राम'ला आपण आले असतांना खेड्या-पाड्यातील अनेक सामान्य शेतकरी-मजूर स्त्रियांशी आपली भेट आम्ही घालून दिली होती. त्या बाया आपआपल्या गावातील हातभट्टीची दारु बंद करण्यासाठी झगडत होत्या, मार खात होत्या. त्यांनी आपल्याला आपल्या शरीरावरील जखमा दाखवल्या होत्या. "आम्हाला दारुबंदीसाठी मदत करा" अशी हाक त्यांनी आपल्याला घातली होती.

त्या जखमी बाया, महाराष्ट्रातील सर्वच स्त्रिया आपल्याला मदतीची हाक घालत आहेत. मदतीअैवजी आपण त्यांना दारुचा महापूर देणार का?

कृपया नवीन दारु दुकानांना परवाने देण्याचा प्रस्ताव रद्द करावा व महाराष्ट्रात दारुचा वापर कमी करण्याची शासकीय नीती आखावी.

आपले व महाराष्ट्राचे शुभाकांक्षी

सविनय

डॉ. अभय बंग डॉ. राणी बंग

सहप्रती : मान. श्री. अनिल देशमुख
अुत्पादन शुल्क मंत्री,
महाराष्ट्र.